**कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर**
**स्थायी समिती सभा क्र.०८, सन २०१७/१८**
**गुरूवार, दिनांक - ०२/११/२०१७**

## कार्यवृत्तांत

कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या, स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक- ०२/११/२०१७ इ. रोजी दुपारी ०१.०० वाजता जिल्हा परिषदेच्या स्वर्गीय वसंतराव नाईक सभागृहात आयोजीत केली होती. सदर सभेचा कार्यवृतांत खालील प्रमाणे

**हजर सदस्यः-**

| | | |
|---|---|---|
| १. | मा.अंबरिषसिंह संजय घाटगे | मा.अध्यक्ष, स्थायी समिती तथा मा.सभापती (शिक्षण व अर्थ) |
| २. | मा.विशांत सुरेश महापुरे | सभापती, समाजकल्याण समिती व सदस्य स्थायी समिती |
| ३. | मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले | सदस्य स्थायी समिती |

येणेप्रमाणे ३ सदस्य व संबंधीत खाते प्रमुख, अधिकारी उपस्थित झाले. सभेमध्ये खालील प्रमाणे चर्चा झाली.

**सचिवः-** आजच्या स्थायी समिती सभेस मा.अध्यक्ष व मा. उपाध्यक्ष, जि.प. कोल्हापूर हे उपस्थित नाहीत तरी उपस्थित समिती सदस्यांमधुन सभा कामकाज चालविणेकामी सभापती निवड करणे आवश्यक आहे.

**मा.अरुणराव इंगवलेः-** आजच्या सभेस मा.सभापती (शिक्षण व अर्थ) यांची सभा कामकाज चालविणेकामी सभापती पदी निवड करावी.

**मा.सभापती (समाज कल्याण):-** यास माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती (शिक्षण व अर्थ) :-** सर्व उपस्थितांचे स्वागत करतो. आजच्या सभेस आवश्यक उपस्थिती दिसून येत नाही.

**सचिव :-** सभेचा कोरम पूर्ण झालेला नाही.

**मा.अरुणराव इंगवलेः-** मा.अध्यक्ष महोदया हया ७३ वी घटना दुरूस्तीच्या अनुषंगाने चर्चासत्रास उपस्थित रहाणेकामी मुंबई येथे गेल्या आहेत. तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सुध्दा शासकिय बैठकीसाठी औरंगाबाद येथे गेले आहेत व सभेचा कोरम पुर्ण नाही तरी आजची सभा कोरम अभावी तहकूब करणे आवश्यक आहे.

**मा.सभापती (समाज कल्याण):-** होय, सभा तहकूब करणे योग्य होईल.

**मा.सभापती (शिक्षण व अर्थ) :-** आजची स्थायी समिती सभा तहकुब करूया व मा.अध्यक्ष महोदया यांना प्रस्ताव सादर करून सदर तहकुब स्थायी समिती सभा घेणे कामी तारीख निश्चित करणे बाबत कार्यवाही करावी.

यानंतर मा. सभापती (शिक्षण व अर्थ) यांनी सदर सभेमध्ये आयत्यावेळचे विषय दाखल करुन घेऊन सभा तहकूब केली.

कार्यवृत्तांत वाचला आणि कायम केला दिनांक ०२/११/२०१७

**(आर.बी.भालेराव)**
**सचिव तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

**(अंबरिषसिंह संजय घाटगे)**
**सभापती स्थायी समिती तथा**
**मा.सभापती (शिक्षण व अर्थ)**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**